**CNR No :- MHSI100001052024**

–: <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. २३/२०२४</u> :–

–: <u>निशाणी १४ वरील आदेश</u> :–

प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१, ५ व ६ चे म्हणणेनुसार, सदरहू दाव्याचेकामी प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी होवून ते या दाव्याचेकामी हजर झालेले आहेत. सदरहु प्रतिवादी यांचेवर समन्सची बजावणी होऊन ९० दिवसांचा कालावधी झालेला असल्याने जरी मे. न्यायालयाने त्यांच्या विरुद्ध कैफियत नाही चा आदेश पारीत केलेला नसला तरी मुदतीच्या कायदयातील तरतुदींनुसार त्यांचे विरुद्ध कैफियत नाही चा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांना या दाव्याचे कामी आपली कैफियत देण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे जमविण्यात बराच कालावधी लागल्याने त्यांना मुदतीत आपली कैफियत देणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करुन बाजु मांडण्याची संधी न दिल्यास त्यांना मिळणाऱ्या न्यायास मुकावे लागणारे आहे. परीणामी प्रतिवादी यांना न्यायाची अनेक प्रकरणे दाखल करावी लागून शारीरिक व मानसीक त्रासास सामोरे जावे लागणारे आहे. सबब, त्यांचे विरुद्ध कैफियत नाहीचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी नि.क्र.१६ वर प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस विरोध दर्शविलेला

आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीतर्फे दाखल नि.क्र.१४ चा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून कायद्यातील अनिवार्य तरतुदीस धरुन नसल्याने तसेच अर्जात नमूद केलेले कारण विश्वासार्ह नसल्याने अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १, ५ व ६ यांस दाव्याच्या गुणदोषावर कैफियत दाखल करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांची कैफियत विहीत मुदतीत दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्याचा कायद्याने ठरवुन दिलेला कालावधी उलटुन गेल्यावर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादी यांनी मोघमपणे आवश्यक माहिती व कागदपत्रे असा उल्लेख केलेला असल्याने अर्जामध्ये नमुद केलेले कारण हे संयुक्तीक असल्याचे दिसुन येत नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादींना त्यांची कैफियत सादर करण्याची उचित संधी नाकारल्यास त्यांच्या न्यायहक्कांवर गदा येणारी आहे. प्रतिवादींनी सादर केलेल्या कैफियतीद्वारे दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. केवळ या कारणास्तव प्रतिवादींनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचीत राहील. या सर्व कारणांचा साकल्याने विचार करता, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

## –:: आदेश ::–

१. रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.१४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांनी एकत्रीतरीत्या वादीस आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १, ५ व ६ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.09.03 13:01:38 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०३.०९.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.